दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५ | अंक २७० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

आजचा दिनविशेष

१९९९: लेखक व्यंकटेश माडगूळकर यांना कुसुमाग्रजा प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार जाहीर.

SUN Tourism
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
99222 22272 / 7602727555

मुंबईत ठाकरे गटाचा महापौर बसेल,
या प्रश्नावर एकनाथ शिंदेंचे ठाकरेंना जिव्हारी लागणारं उत्तर

शिवसेनेचे पक्ष प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी त्यांनी पत्रकारांच्या विविध प्रश्नांना उत्तर दिली. यावेळी पत्रकारांनी त्यांना ठाकरे गटाचा महापौर बसेल असं बोलले जातय यावर विचारले. त्यावर एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिले. "त्यांच्या बरोबर दुसरं कोणीच नाही वाटते. महाविकास आघाडी तुटलेली आहे असं वाटते. आता जे सुरु आहे ते तुटलेले आहे का? ते एकटेच आहेत. मी अतिशोयक्ती करणार नाही, पण त्यांची जागा BEST ल्या छोट्याशा निवडणुकीने दाखवून दिली. त्यातून बोध घेतला पाहिजे" असं एकनाथ शिंदे म्हणाले. "मी आपल्याला खात्रीशीरपणे सांगतो आणि मी मुख्यमंत्री असताना अडीच वर्षात मुंबई शहरासाठी घेतलेले निर्णय रस्ते असेल, मेट्रो, वैद्यकीय सुविधा, फ्लायओव्हर, स्वच्छता असेल, कारशेडचा विषय हे सर्व विषय मार्गी लावलेले आहेत" असा दावा एकनाथ शिंदे यांनी केला. "मुंबई बाहेर फेकला गेलेला मुंबईकर याला पुन्हा मुंबईत आणण्यासाठी क्लस्टर धोरण राबवतोय.जी प्राधिकरण आहेत, एमएसआरडीसी, एमआयडीसी, बीएमसी या सगळ्यांना घेऊन रखडलेले प्रकल्प क्लस्टरच्या माध्यमातून पूनर्विकासाच्या माध्यमातून मुंबईबाहेर गेलेले लोक मुंबईत आणण्याची प्रक्रिया सुरु केली आहे" असं एकनाथ शिंदे म्हणाले. "त्यामुळे या सर्व विकास कामाच्या जोरावर, विकसाच्या ताकदीवर महायुतीच मुंबईत सत्तेवर येईल. महायुतीचा भगवा झेंडा मुंबई महापालिकेवर फडकेल. आम्ही लोकसभा जिंकली, विधानसभा जिंकली आहे. महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्था जिंकू" असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

हैदराबाद गॅझेट विरोधातील याचिका न्यायालयानं फेटाळली, मनोज जरांगे पाटलांची प्रतिक्रिया

आमचा न्याय देवतेवर विश्वास आहे, गोरगरिबांच्या बाजूने न्यायदेवता उभी राहाते, सरकारनंतर न्यायदेवता हीच गोरगरिबांचा आधार आहे.

मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्यात आले आहे, मात्र त्यावरून आता ओबीसी समाज चांगलाच आक्रमक झाला आहे. ओबीसी समाजाकडून हैदराबाद गॅझेटच्या जीआरला विरोध होत आहे. हैदराबाद गॅझेटच्या जीआरविरोधात मुंबई हाय कोर्टात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती, मात्र ही जनहित याचिका हाय कोर्टाने आज फेटाळून लावली आहे. हा मराठा समाजासाठी मोठा दिलासा मानला जात आहे, दरम्यान यावर आता मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. हैदराबाद गॅझेटच्या जीआरविरोधातील याचिका फेटाळल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. आमचा न्याय देवतेवर विश्वास आहे, गोरगरिबांच्या बाजूने न्यायदेवता उभी राहाते, सरकारनंतर न्यायदेवता हीच गोरगरिबांचा आधार आहे. सरकारला त्यांची बाजू भक्कमपणे मांडावीच लागणार आहे, असं यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी छगन भुजबळ यांच्यावर देखील पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल केला आहे. यावेळी बोलताना त्यांनी भुजबळांचा उल्लेख अलिबाबा असा केला आहे. येवल्याचा अलिबाबा दोन आरक्षण खात आहे, त्यांना लवकरच बेसन -भाकरी खावी लागेल असा खोचक टोला यावेळी जरांगे पाटील यांनी भुजबळ यांना लगावला आहे. मी गोरगरिबांसाठी सर्व काही करत आहे. समाजाला माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. काही अभ्यासकांनी समाजाला अजून काहीच दिलं नाही, मी माझं काम करत आहे, त्यामुळे समाजाने जे गैरसमज पसरवतात त्यांच्याकडे लक्ष देऊ नये, असे देखील यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

'बीएसएनएल'च्या सल्लागार समितीवर प्रकाश जेधे यांची नियुक्ती

केंद्र सरकारच्या 'भारत संचार निगम लिमिटेड' च्या(BSNL) सल्लागार समिती(Advisory Committee) सदस्य पदी प्रकाश श्रीराम जेधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. 'बीएसएनएल'च्या संचालक उर्वशी संघवान यांनी ही नियुक्ती केल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. सदरील नियुक्ती ही बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांच्या शिफारशीवरून करण्यात आलेली आहे. प्रकाश जेधे हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरचंद्र पवार पक्षा)चे सक्रिय कार्यकर्ते असून खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांचे खंदे समर्थक आहेत. प्रकाश जेधे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरचंद्र पवार) वतीने लढवल्या जाणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये व संघटनात्मक बांधणीत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. प्रकाश जेधे यांनी यापूर्वी वडवणी तालुका रोजगार हमी योजना समितीच्या सदस्य पदी ही काम केलेले आहे. सदरील नियुक्ती बद्दल प्रकाश जेधे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

प्रसिद्ध उद्योगपती शिवशताक्षी मसाल्याचे मॅनेजिंग डायरेक्टर कुलदीप चिवटे यांची आष्टी येथे सदिच्छा भेट

कडा (प्रतिनिधी) कुर्डुवाडी येथील प्रसिद्ध उद्योगपती शिवशताक्षी मसाल्याचे मॅनेजिंग डायरेक्टर कुलदीप शेठ चिवटे यांनी आज दिनांक १८ सप्टेंबर गुरुवार रोजी आष्टी येथे सदिच्छा भेट दिली. असता सर्व व्यापाऱ्यांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ए.एस.म. लिंगेश्वर तकटे सर उपस्थित होते. उद्योगपती कुलदीप शेठ यांनी सांगितले की खूप कमी दिवसात आमचे कष्ट व व्यापाऱ्यांची व ग्राहकांची साथ या जोरावर बाजारपेठेत आम्ही यशाचे शिखर सर करत आहोत.आष्टीकरांचे प्रेम विसणार नाही.तसेच त्यांनी सर्व व्यापाऱ्यांना कुर्डुवाडी येथे कंपनी व्हिजीट साठी येण्याचे निमंत्रण दिले. तर सर्व व्यापाऱ्यांकडून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी श्रीरंगराव सातपुते,शितल मुथा, कल्पेश मेहर,चैतन्य मेहर,अभय मेहर, सुनील सातपुते, सतीश हराळ, पिंटू शेठ कानगुडे, बाळू धोंडे, विनोद आजबे,बाळासाहेब वांडरे, सचिन काकडे, महावीर शेठ संचेती, गणेश धोंडे, विकास पोकळे ,प्रशांत कासवा ,हनुमंत शेंदूरकर,प्रशांत काळे,आयुब मोमीन सह आदी व्यापारी बांधव उपस्थित होते.

पत्रकार शेख हामीद सूर्योदय च्या उत्कृष्ट पुरस्काराने सन्मानित
मनोज जंरागे पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

माजलगाव प्रतिनिधी माजलगाव तालुक्यात दैनिक सूर्योदय वृत्तपत्र हा शासकीय निमशासकीय कार्यालय व सामाजिक कार्यकर्ता संपर्क कार्यालय तसेच तालुक्यातील घराघरात जावे यासाठी तळमळीने प्रयत्न करणारे आणि कष्ट करणारे माजलगाव चे तालुका प्रतिनिधी शेख हमीद आज दै.सूर्योदयाच्या वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ट प्रतिनिधी म्हणून त्यांना पुरस्कार देण्यात आला व सन्मान करण्यात आला

माजलगाव तालुक्यात अनेक दैनिकाची रेलचेल आहे त्यातूनही दै.सूर्योदय दारा दारात कसे पोहोचले जाईल तळमळीने तन-मन-धनाने प्रयत्न करणारे माजलगाव तालुक्याचे सूर्योदयचे प्रतिनिधी शेख हमीद यांची दै. सूर्योदय कार्यालयाने दखल घेतली आणि आज दै.सूर्योदयचा वर्धापन दिनाच्या औचित्य साधून संघर्ष नायक मनोज दादा जरांगे पाटील, दै.सूर्योदयचे संपादक गंगाधर नाना काळकुटे,दै.सूर्योदयचे कार्यकारी संपादक दीपक काळकुटे यांच्या आणि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आज शेख हामीद यांना जिल्ह्यातील उत्कृष्ट तालुका प्रतिनिधी म्हणून पुरस्कार देण्यात आला व सन्मान करण्यात आला यावेळी परमेश्वर सोळंके, बाळासाहेब उफाडे, बाळासाहेब आडागळे, संतोष रासवे यांच्या बहुसंख्य माजलगाव तालुक्यातील पत्रकार व कार्यकर्ते उपस्थित होते शेख हमीद यांना उत्कृष्ट प्रतिनिधी म्हणून मिळालेल्या पुरस्काराबद्दल शेख हमीद यांचे माजलगाव तालुक्यातून सर्वत्र अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे व शुभेच्छा देण्यात येत आहेत.

डॉ.नागराज महानोर , पक्षु वैद्यकीय सेवेसाठी 24तास हजर, भोपळा ग्रामस्थांनी केले डॉ महानोर यांचे कौतुक.

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी राज्यात गेल्या दोन दिवसापासून मुसळधार पावसाने थैमान घातले आहे, मुके जनावरे सध्या विविध रोगामुळे आजारी पडलेले आहेत. पशुधकीय दवाखाना श्रेणी-2 -भोपळा अंतर्गत भोपळा, बोरगाव, लाखा, डोखा, हतगाव.... या सर्व गावाचा मांजरा नदीलां पूर आल्यामुळे वाहतुकीचा संपर्क तुटला असतानाही जीवाची पर्वा न करता डॉ नागराज महानोर व विश्वजीत भांगे यानी चिखल ,पाणी तुडवत यांनी शेतकरी व पशुपालकांना या संकटात खूप सहकार्य केले त्यांचे गावकऱ्यांनी आभार मानले या वेळी विजयकुमार जाधव सरपंच (भोपळा) माऊली गोंड, चेअरमन व समस्त ग्रामस्थांनी डॉ.नागराज महानोर यांचे आभार मानले

घटस्थापना शारदीय नवरात्र महोत्सव निमित्त सत्संग व महागंगा आरती कार्यक्रमाचे आयोजन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : शहराला लागून असलेल्या उत्तर वाहिनी पैनगंगा नदीकिनारी मागील अनेक वर्षापासून ह.भ.प.नारायण महाराज यांच्या शिव संकल्प व मार्गदर्शनानुसार घटस्थापना शारदीय नवरात्र पर्वकाळावर महागंगा आरतीचे आयोजन करण्यात येत असते. याही वर्षी दिनांक २२- सप्टेंबर रोजी सोमवारी सायंकाळी ५ ५ वाजता शिवमंदिर संस्थान पैनगंगा तीरी किनवट येथे घटस्थापना पर्वकाळावर गंगापूजन व महागंगा आरतीचे आयोजन करण्यात आले असून ह.भ.प.नारायण महाराज यांचे सत्संग प्रवचन होणार आहे तरी किनवट शहरातील व परिसरातील समस्त भाविक भक्तांनी या सत्संग व महागंगा आरती कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन समस्त सत्संग परिवार किनवट यांनी केले आहे.

किनवट येथे आरक्षणाच्या मागणीसाठी बंजारा समाजाचा विराट मोर्चा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : सकल बंजारा समाजाच्या वतीने अनुसूचित जमातीमधील आरक्षणासाठी किनवट येथील सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढण्यात आला. गुरुवारी निघालेल्या या मोर्चात हजारो महिला, पुरुष पारंपारिक वेशभुषेत सहभागी झाले होते. हैदराबाद गॅझेटनुसार मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला. यानंतर बंजारा समाजाने या गॅझेटचा आधार आरक्षणासाठी घेतला आहे. बंजारा समाजालाही अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे या मागणीकरिता गुरुवारी किनवट येथील सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढत प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यात राज्य पुनर्गठन अधिनियमन १९५६ अंतर्गत किनवट तालुका नांदेड जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला. हा तालुका मुळात हैदराबाद स्टेटमधील आदिलाबाद जिल्ह्याचा भाग होता, भौगोलिक दृष्ट्या किनवट ते आदिलाबाद अंतर केवळ ५० किलोमीटर असून नांदेड जिल्ह्याचे अंतर १५० किलोमीटर आहे. यावरून हा समावेश जनतेच्या नाही तर प्रशासकीय कामाच्या सोयीसाठी करण्यात आला असे स्पष्ट होते. भाषावार प्रांत रचना करताना किनवट तालुक्यातील ७२ टक्के जनता अमराठी भाषिक होती, आजही आहे त्यामुळे मूलभूत तत्त्वाचा भंग होत आहे. १९५६ च्या अधिनियमानुसार थोटी समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातील आरक्षण आदिलाबाद व राजुरा येथे कायम ठेवण्यात आले आहे. तसेच झारखंड राज्यात असेच आरक्षण कामय ठेवण्यात आले आहे. त्यामुळे सध्या असलेले आदिवासी वांधवांच्या ७ टक्के आरक्षणात हिस्सा न देता पूर्वी मिळणारे डी नोटिफाईड ट्राईव म्हणून स्वतंत्र साडेपाच टक्के आरक्षण देऊन अनुसूचित जाती जमाती बंजारा समाजाला समाविष्ट करावे तसेच न्यायमूर्ती वापट आयोगाने २००४ केलेली शिफारस लागू करावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे या मोर्चात बंजारा समाजातील महिला पुरुष हातात हमा आरक्षण हमनेच देव असा मजकूर असलेले फलक हातात घेऊन पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com

संपादकीय

होमिओपॅथिक औषधे खरचं केमोथेरपीवर उपचार करतात का?

केमोथेरपी ही एक कर्करोग उपचार आहे जी शरीरातील कर्करोगाच्या पेशी नष्ट करण्यासाठी औषधांचा वापर करते. त्याचे ध्येय कर्करोगाची वाढ थांबवणे आणि रोगग्रस्त पेशी नष्ट करणे आहे. आधीच पसरलेल्या ट्यूमर किंवा कर्करोगाच्या रुग्णांसाठी याची शिफारस केली जाते. केमोथेरपी केवळ ऑन्कोलॉजिस्टच्या देखरेखीखाली दिली जाते. ती तोंडावाटे औषध, इंजेक्शन किंवा आयव्ही ड्रिप म्हणून दिली जाऊ शकते. उपचार योजना रुग्णाचे वय, प्रकार आणि टप्प्यानुसार ठरवली जाते. कधीकधी ती शस्त्रक्रिया करण्यापूर्वी किंवा रेडिएशनपूर्वी दिली जाते आणि कधीकधी नंतर. ही एक जीवनरक्षक उपचार मानली जाते. तथापि, हे अनेक दुष्परिणामांशी देखील संबंधित आहे, जे रुग्णाच्या सहनशीलतेवर आणि शरीराच्या प्रतिसादावर अवलंबून असते केमोथेरपी दरम्यान, रुग्णांना थकवा, अशक्तपणा आणि उर्जेचा अभाव जाणवू शकतो. मळमळ, उलट्या आणि भूक न लागणे हे देखील सामान्य आहे. अनेक रुग्णांना तोंड आणि घशात फोड येणे, त्वचा आणि नखांमध्ये बदल किंवा जळजळ होणे असे अनुभव येतात. केस गळणे, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे आणि अस्वस्थता देखील सामान्य आहे. दुष्परिणामांची तीव्रता रुग्णाचे वय, शरीराची सहनशीलता आणि घेत असलेल्या औषधांवर अवलंबून असते. कधीकधी, ते केवळ गैरसोयीपेक्षा जास्त असू शकतात परंतु गंभीर आरोग्य समस्या बनू शकतात. म्हणूनच, रुग्णाला आरामदायी जीवन आणि प्रभावी उपचार सुनिश्चित करण्यासाठी सहाय्यक काळजी घेणे आवश्यक आहे. तर, केमोथेरपीचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी होमिओपॅथिक औषधे घेणे फायदेशीर ठरेल का ते समजून घेऊया. तज्ञांच्या मते, होमिओपॅथी कर्करोग बरा करत नाही आणि पारंपारिक कर्करोग उपचारांना पर्याय म्हणून वापरली जाऊ शकत नाही. पारंपारिक उपचार म्हणजे विज्ञान आणि वैद्यकीय संशोधनावर आधारित उपचार, जसे की केमोथेरपी, शस्त्रक्रिया आणि रेडिएशन थेरपी. तथापि, सहयोगी परिस्थितीत, होमिओपॅथीचा वापर रुग्णांना आधार देण्यासाठी आणि आराम देण्यासाठी केला जाऊ शकतो. अभ्यास आणि रुग्णांच्या अनुभवांवरून असे दिसून येते की होमिओपॅथिक औषधे थकवा, मळमळ, तोंड आणि त्वचेचे घाव आणि अस्वस्थता यासारख्या केमोथेरपीच्या दुष्परिणामांपासून आराम देऊ शकतात. प्रशिक्षित होमिओपॅथिक प्रॅक्टिशनरच्या देखरेखीखाली, ते रुग्णाच्या आराम, ऊर्जा आणि मानसिक स्थिती सुधारण्यास मदत करते. ते संपूर्ण शरीर आणि मनाला आधार देते

शिक्षण महर्षी डॉ.बापुजी साळुंखे हायस्कूल मध्ये शिक्षण महर्षी डॉक्टर बापूजी साळुंखे हायस्कूल सुशिलादेवी साळुंखे यांची जयंती साजरी

बीड/प्रतिनीधी:-बीडमध्ये दिनांक 04/09 /2025 रोजी संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांची जयंती उत्साहात पार पडली. आधुनिक महाराष्ट्राच्या शिक्षण प्रसारात संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांनी शिक्षण महर्षी डॉक्टर बापूजी साळुंखे यांच्या खांद्याला खांदा लावून समर्पित भावनेने सर्व आयुष्य वेचले संस्थामाता सौ सुशिलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशालेचे मुख्याध्यापक डॉ. संजयकुमार मुरूमकर तसेच ज्येष्ठ शिक्षक श्री मुंडे.ए. एच., श्री तांदळे वाय बी श्री. सुमेश मोराळे यांनी केले. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कुमारी ऋतुजा गिरी कुमारी पुनम रत्नपारखे यांनी विद्यार्थी मनोगत व्यक्त केले.विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक श्री मुंडे सर यांनी आपल्या मनोगतातून सुशीलादेवी साळुंखे यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षीय भाषण डॉक्टर मुरूमकर सर यांनी केले. आपल्या मनोगतातून त्यांनी संस्थामाता आधुनिक महाराष्ट्राच्या शिक्षण माता आहेत हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मुंडे मॅडम तर आभार प्रदर्शन श्री कुवर सर यांनी केले. याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षण महर्षी डॉक्टर बापूजी साळुंखे हायस्कूल बीड येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात संपन्न...

बीड /प्रतिनिधी:- शिक्षण महर्षी डॉक्टर बापूजी साळुंखे हायस्कूल बीड,येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन 17 सप्टेंबर विविध उपक्रमाने संपन्न झाला,विद्यालयात निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा,रांगोळी स्पर्धा, संपन्न झाली,विद्यालयात सकाळी प्रभात फेरी काढण्यात आली. ध्वजारोहण विद्यालय चे ज्येष्ठ शिक्षक आदरणीय श्री मुंडे अनिल सर यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मुंडे मॅडम, तसेच श्री मोराळे सर, यांनी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन श्री तांदळे सर व श्रीमती आव्हाड मॅडम यांनी केले तर आभार श्री कुवर व्ही एम सर यांनी मानले तसेच आविष्कार फाउंडेशन इंडिया "राज्यस्तरीय गुणवंत कर्मचारी २०२५ चा पुरस्कार आमचे मित्र,मार्गदर्शक सन्मानीय नवले जी आर (नाना) यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन व भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य , तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

केज तालुक्यासह बीड जिल्ह्यात मुसळधार पावसाचा हाहाकार; शेतीचे प्रचंड नुकसान

महाएनजिओ फेडरेशनचे जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांची सरकारकडे आर्थिक मदतीची मागणी

बीड / प्रतिनिधी : - मागील तीन दिवसांपासून बीड जिल्ह्यात मुसळधार पावसाने थैमान घातले असून, विशेषतः केज तालुका आणि आसपासच्या भागात शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पावसामुळे उभ्या पिकांवर पाणी साचल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, शेतकरी अडचणीत आले आहेत. या पार्श्वभूमीवर महाएनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्यचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी राज्य सरकारकडे शेतकऱ्यांना तातडीने हेक्टर 1 लक्ष रुपये आर्थिक मदत जाहीर करण्याची जोरदार मागणी केली आहे. > "शेतीचे झालेले नुकसान पाहता प्रशासनाने तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसानभरपाई जाहीर करावी. फक्त आश्वासने न देता शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी 1 लक्ष रुपये थेट मदत जमा होणे अत्यावश्यक आहे," असे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले. बीड जिल्ह्यातील अनेक भागांत सोयाबीन, कापूस, भाजीपाला,मूग, ऊस आणि तूर यासारखी पिके पाण्याखाली गेली आहेत. काही ठिकाणी मातीचा थर वाहून गेल्याने शेताची गुणवत्ता देखील खराब झाली आहे. यामुळे आगामी हंगामावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जनावरांचे देखील नुकसान पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे जनावरे, शेती उपकरणे, साठवलेले धान्य व खताचे साठे देखील नष्ट झाले आहेत. अनेक कुटुंबांना आपल्या शेतवस्त्यांवरून गावात स्थलांतर करावे लागले आहे. सरकारने तातडीने उपाययोजना करावयात बाजीराव ढाकणे यांनी पुढे सांगितले की, "सरकारने या संकटाची गांभीर्याने दखल घेऊन, जिल्हा प्रशासनामार्फत युद्धपातळीवर मदतकार्य सुरू करावे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना फक्त आधार नव्हे, तर थेट मदतीची गरज आहे." या भागात अजूनही हवामान ढगाळ असून पुढील काही दिवस पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. प्रशासनाने मदतकार्याची गती वाढवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

कुणबी नोंद न सापडल्यामुळे कुणबी प्रमाणपत्र मिळत नाही या चितेतून मोरगाव ता.बीड येथील विद्यार्थ्याने घेतला गळफास.

बीड: प्रतिनिधी मोरगाव ता.बीड येथील इयत्ता दहावीत शिकणाऱ्या श्लोक अण्णासाहेब कागदे या विद्यार्थ्याने आपल्या कुटुंबातील कोणाचीही कुणबी नोंद आढळून येत नाही, त्या कारणाने कुणबी प्रमाणपत्र मिळण्यास अडचण निर्माण होत आहे. या विवेचनेतून नैराश्यपोटी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी स्वत: गळफास घेऊन आत्महत्या केली. तो आताच झालेल्या मुंबई येथील आंदोलनात सहभागी झाला होता. श्लोकने आत्महत्या केल्यामुळे आणखीन एका मराठा बांधवाचा बळी गेला त्यामुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेक तरुणांचा शिवसेना ओबीसी व्हीजेएनटी सेनेत प्रवेश!

बीड, प्रतिनिधी- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंदजी दिघे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार मा. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या कार्यप्रेरणेने आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील अनेक तरुण कार्यकर्त्यांनी काल दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय बीड येथे शिवसेना ओ.बी.सी-व्ही. जे.एन.टी सेनेत जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, नवनिर्वाचित तालुकाप्रमुख अशोक दुधाळ व जिल्हा संघटक दगडू गायकवाड यांच्या यांच्या माध्यमातून झाला आहे. प्रवेश घेणाऱ्यांमध्ये विक्रम बिडवे, अशोक पंडित, जीवा वैद्य, जालिंदर जगताप, गणेश काळे, निलेश साळुंखे, शुभम सरडे व अशोक झगडे यांचा समावेश असून यावेळी विक्रम बिडवे यांची ओ.बी.सी-व्ही.जे.एन.टी सेनेच्या उपजिल्हाप्रमुख म्हणून निवड करून नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. शिवसेनेच्या विचारधारेवर विश्वास ठेवून व शिंदे साहेबांच्या जनतेसाठी असलेल्या प्रामाणिक कार्यपद्धतीतून प्रेरणा घेऊन झालेला हा जाहीर प्रवेश संघटनेच्या बळकटीसाठी तसेच समाज घटकांच्या प्रश्नांवर लढा देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला जिल्हा संघटक सुनील सुरवसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व शिवसेना जिल्हा सहसमन्वयक दीपक काळे तसेच प्रतिक कांबळे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल माणोतीराव वाईकर
शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com

नगरपालिका मूग गिळून गप्पा का

खरोखरच बीड शहरातील दुर्व्यस्था पाहुण शांत बसने म्हणजे पालिकेचे अपराध पोटात गिळून घेणे असल्या सारखे आहे. बिडची जनता पण इतकी शांत का बसते हेच कळतं नाही.अन्न,पाणी आणि निवारा हि माणसाचे मूलभूत हक्क आहेत. पाणी वीस दिवसाने तर काही ठीकणे महिनो ना महिणे येत नाही. रस्ते खराब आहेत.
आपण खड्यात आहोत का बीड खड्यात आहे तेच कळतं नाही.ट्रॅफिक चा उलट त्रासच होतो.गैर ठिकाणी ड्युटी वर असतात.
किती आणि किती प्रकाराचा त्रास लोकांनी सहण करायचा.
रस्त्यावरती कचरा वरचे वर साठत जातो.मंत्री संत्री कोणी आलेतरच रस्ते स्वच्छ करता.
पालिका सरळ म्हणते माणसं नाहीत करायला मग आता रस्ता स्वच्छ करायला कशी मिळतात.मागील पगारे या लोकांची कुठे गेली.अनेक पगारे गिळकृत करून भरपेट खाल्ली.हा सर्व आलेला निधी जातो कोठे हे विचारायचा जाब लोकांना आहे.
सर्व बीड शहरात खड्डे पावसाच्या अगोदरच दुरुस्त करायला पाहिजे होते.पण परत तीच बोब नगरपालीका कडे यांचे पगार काय दयाचे.
रस्ते काय अन रस्त्या वराचा आणि गल्ली बोळा पासून ते मोठ्या कॉलनी पर्यत काय ठीक ठिकाणी कच्याऱ्या चे ढिगारे वर्षानुवर्षे काय आहे त्याच ठिकाणी आहेत.
या घाणी मुळे अनेक रोग,आजार वाढतच चालली आहे.लहान मुले,महिला,वडिलधारी मंडळी हे सतत आजरी असतात.परंतू म्हणजे नगरपालिकेला करायच काय असेच दिसते. कित्येक वर्ष. नळ पट्टी वर्षा ची देऊन पण नळे सारी कोरडीच. शहरातील बऱ्याच रस्त्यावर दिवे लावलेली नाहीत. अंधारात कसे करायचे.
नगरपालिका मात्र पैसे गिळून मोठी झाली.
हा शासकीय पैसा खाऊन मूग गिळून गप्पा का असा जाब विचारला पाहिजे.समोर येऊन निवेदने द्याची असतात.वेळ आलीच तर पालिका समोर उपोषणाला बसायचं असते.असे मागे मागे पालिकेवर राग mदाखवून,त्रास सहण नाही करायचा.
नगरपालिकेलाj निधी गेला कोठे विचारायचा पूर्ण अधिकार आहे आपण विचारायचा.
लोकांहो बोला,आपल्या मूलभूत गरजा आपल्याला हव्या आहेत.एकजुटीने एकत्र येऊन या शहराचा विकास करूयात

संपर्क- रुपाली देशपांडे
8888955539

बीड येथे होणाऱ्या नमो युवा रन मॅरेथॉनमध्ये युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे– संजय आंधळे

बीड : प्रतिनिधी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नमो युवा रन नशा मुक्त मॅरेथॉन चे बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रविवार दि. २१ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत नमो युवारन नशामुक्त भारत, मॅरेथॉन पार पडणार आहे तरी बीड जिल्ह्यातील तरुण, युवक, युवती, क्रिडापटु, धावपटु यांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

देशाचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबर पर्यंत भारतीय जनता पार्टी पक्षाच्या वतीने सेवा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने भाजपा युवा मोर्चाच्या वतीने नमो युवारन, नशामुक्त भारत, मॅरेथॉनला पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे या हिरवा झेंडा दाखवणार आहेत.व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांची उपस्थिती लाभणार आहे. ही स्पर्धा बीड शहरातील छत्रपती शिवाजी चौकात सकाळी ७ वाजता पार पडणार आहे. या मॅरेथॉन मध्ये चार गट करण्यात आले आहे. वय १६ ते ३० वर्ष वयोगट, ओपन गट, महिलांसाठी वय १६ ते ३० वर्ष वयोगट, महिलांसाठी ओपन गट असे चार गट करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चऱ्हाटा फाटा ते छत्रपती शिवाजी चौक असे ५ कि.मी रन असणार आहे. यामध्ये पारितोषिक ठेवण्यात आले असून प्रथम बक्षीस ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार, तृतीय २ हजार असे प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार आहे. व सहभागी धावपट्टू यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार असून या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील युवक, युवती, क्रीडापटू, धावपटू, डॉक्टर, वकील, पत्रकार, पोलीस व नागरिकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे अशा आवाहन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

कै. चंद्रकलाताई गदळे यांच्या वर्षश्राद्ध कार्यक्रमा निमित्त सोमवारी समाधान शर्मा महाराज यांच्या कीर्तनाचे दहिफळ (वडमाऊली) येथे आयोजन

केज(प्रतिनिधी):- तालुक्यातील दहिफळ (वड) येथील सेवानिवृत्त प्राचार्य तथा शालेय संस्थापक अध्यक्ष सखाहारी (तात्या) गदळे यांच्या पत्नी व भाजपा युवा मोर्चाचे केज तालुकाध्यक्ष राहुलभैय्या गदळे यांच्या मातोश्री कै. सौ. चंद्रकलाताई सखाहारी गदळे यांच्या चतुर्थ वर्षश्राद्ध कार्यक्रमा निमित्त दि.२२ सप्टेंबर सोमवार रोजी सकाळी दहा वाजता केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील येथील सेवानिवृत्त प्राचार्य तथा शालेय संस्थापक अध्यक्ष सखाहारी (तात्या) गदळे यांच्या पत्नी व भाजपा युवा मोर्चाचे केज

तालुकाध्यक्ष राहुलभैय्या गदळे यांच्या मातोश्री कै. सौ. चंद्रकलाताई सखाहारी

गदळे यांच्या चतुर्थ वर्षश्राद्ध कार्यक्रमा निमित्त दहिफळ (वड) ता. केज

येथील श्रीक्षेत्र वडमाऊली मंदीरा जवळ ह.भ.प. सखाहारी (तात्या) गदळे यांनी स्थापन केलेल्या शिवप्रतिष्ठाण संस्थान येथे सुप्रसिद्ध रामायनाचार्य व कीर्तनकार ह.भ.प. समाधान शर्मा महाराज यांच्या सुश्राव्य किर्तनाचा कार्यक्रम सोमवार दि.२२ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता आयोजित केला आहे. या कार्यक्रमास आपण उपस्थित रहावे अशी विनंती ह.भ.प. सखाहारी (तात्या) गदळे, राहुलभैय्या गदळे, शरद बप्पा गदळे, सरपंच अनिताताई गदळे, डॉ. शशिकांत दहिफळकर, जयदत्त दहिफळकर व गदळे परिवाराने केली आहे.

लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूलमध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमीत्त रमाकांत मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहन संपन्न

केज (प्रतिनिधी)-केज शहरापासुन जवळच असलेल्या बीड रोडवरील लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूलमध्ये दि. १७ सप्टेंबर बुधवार रोजी या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. रमाकांत (बापू) मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहन करुन हा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात संपन्न झाला यावेळी प्राचार्य, प्राध्यापक आणि प्रथम, द्वितीय वर्षाचे विद्यार्थीनी व विद्यार्थी उपस्थित होते. केज शहरापासुन जवळच असलेल्या बीड रोडवर असलेल्या सिध्दीविनायक शैक्षणिक सेवाभावी संस्था बीड संचलित, लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूलमध्ये दि.१७ सप्टेंबर बुधवार रोजी सकाळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. रमाकांत (बापू) मुंडे यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहन करुन महापुरुषांच्या प्रतिमांचे पुजन केले. या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे महत्व रमाकांत (बापू) मुंडे यांनी उपस्थितांना सांगीतले. या ठीकाणी लक्ष्मी नर्सिंग स्कूलचे प्राचार्य रवि पवार सर, प्रा. वैष्णवी मुंडेमॅडम, प्रा. नम्रता गायकेमॅडम, प्रा. आकांक्षा राऊतमॅडम, प्रा. चौरसर, लखेरासर व शिक्षक इतर कर्मचारी सोनवणेताई, नर्सिंगच्या प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थ्यांनी व विद्यार्थी उपस्थित होते.



धोकादायक विद्युत रोहित्राला कपड्याने झाकण्याची प्रशासनावर नामुष्की ; सोमवारी "सेल्फी विथ रोहित्र हॅशटॅग अजितदादा" लक्ष्यवेधी आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीड :- (दि.१८)मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या बीड दौऱ्या दरम्यान नगरनाका ते कृषी कॉलनी मार्गावरील एसबीआय बँकेजवळ असलेल्या धोकादायक विद्युत रोहित्राला कपड्याने झाकून ठेवण्याची नामुष्की जिल्हा प्रशासनावर आली. अनेक वर्षांपासून रस्त्याच्या मधोमध असणारे हे रोहित्र व विजेचे खांब नागरिकांच्या जीवाला धोका ठरत असून अपघातांच्या घटनाही घडलेल्या आहेत. सामाजिक कार्यकर्ते व मुख्य प्रचार

प्रमुख, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ बीड जिल्हा डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी याविरोधात वारंवार निवेदने व आंदोलन केले तरी महावितरण व नगरपरिषद प्रशासन जबाबदारी झटकत आहेत. नुकत्याच झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात प्रशासनाने रोहित्र झाकून टेंवून प्रश्न झाकण्याचा प्रयत्न केला मात्र नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. नगरनाका ते कृषी कॉलनी हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असून येथे नाट्यगृह, दवाखाने, शाळा, शिकवण्या असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशा गर्दीच्या मार्गावर रस्त्याच्या मधोमध उघडे रोहित्र व लोंबकळणाऱ्या तारांमुळे अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. या गंभीर प्रश्नाकडे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी (दि.२२) त्याच ठिकाणी "सेल्फी विथ रोहित्र हॅशटॅग अजितदादा" हे लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याचे डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले.

डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो. ८१८०९२७५७२

बडव्यांनी टाकलेल्या विळख्यामुळे खा. बजरंग सोनवणे यांचे खंदे समर्थक

गोविंद ससाणे यांचा उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत ग्राम पंचायत सदस्यांसह आडसकर गटात जाहिर प्रवेश (उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या खंबीर नेतृत्वात्यावर विश्वास)

केज! प्रतिनिधीखा. बजरंग सोनवणे यांचे खंदे समर्थक सोनीजवळा गावचे सरपंच गोविंद ससाणे यांनी त्यांच्या सहकार्यासह अजित पवार (राष्ट्रवादी) गटात जाहिर प्रवेश केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री मा.अजित (दादा) पवार यांच्या उपस्थितीत व राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जेष्ठ नेते मा. रमेशराव आडसकर यांच्या नेतृत्वा खाली सोनी जवळा गावचे सरपंच गोविंद ससाणे, यांनी त्यांचे सहकार्य सह राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये रमेश आडसकर साहेबांचे नेतृत्वा खाली जाहीर प्रवेश केला आहे यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना सोनी जवळा गावचे सरपंच, गोविंद ससाणे यांनी सांगितले कि मी पुर्वी खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या नेतृत्वा खाली अतिशय इमानदारी ने काम केले परंतु खासदारांच्या जवळच्या, बडव्यांनी माझ्या विरोधात काम केले, प्रसंगी कोहीनी माझ्या विषयी अपशब्द वापरले, मी गावचा सरपंच झाल्यापासून गावची एकही तक्रार पोलिस स्टेशन ला जावू दिली नाही, परंतु माझ्या गावच्या विकास कामांचा विकासात्मक निधी खासदार साहेबांच्या बगल बच्चांनी माझ्याकडे येवू दिला नाही मी गावच्या विकासासाठी आदरणीय रमेशराव

आडसकर साहेबांच्या नेतृत्वा खाली राज्याचे उप मुख्य मंत्री मा. अजीत (दादा) पवार यांच्या उपस्थितीमध्ये अजीत पवार(राष्ट्रवादी) पक्षात जाहिर प्रवेश करत आहे.मी खा. बजरंग सोनवणे यांच्या जवळ असताना मोर्चे, आंदोलने यामध्ये उत्स्फुर्त सहभाग घेतला तसेच वेळोवेळी त्यांचा आदेश सर्वस्व मानून प्रामाणिक पणे काम केले परंतु खासदारांच्या जवळचे बडवे,टवाळखोर यांच्या त्रासाला कंटाळून खासदार बप्पांची साथ सोडून राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करत आहे. तसेच मी निवडणूक वगैरे लढवणार नसून फक्त माझा गाव आणि गावच्या विकासा वर लक्ष केंद्रित करणार असून मी कोणच्या कुठल्याही आमिषाला बळी न पडता आडसकर साहेबांच्या नेतृत्वा खाली त्यांच्या विश्वासाला तडा न जावू देता संधीचे सोने करत गावचा विकास करणार आहे. खासदार साहेबांच्या अवती भोवती असणारे बगलबच्चे लोकांना कंटाळून जवळचे लोक त्यांची साथ सोडत आहेत अशा गोष्टीकडे खासदार साहेबांनी लक्ष द्यायला हवे. १)
आमचे नेते आदरणीय रमेश राव आडसकर साहेब हे राजकारणापेक्षा जनतेच्या कामांकडे, हिताकडे लक्ष देतात आम्ही जनतेच्या कामाच्या बाबतीत राजकारण करत नाहीत, त्यामुळे आम्ही संपूर्ण ताकदीने सोनी जवळा गावचे सरपंच गोविंद ससाणे यांच्या पाठिशी भक्कम पणे उभे राहून मा. आडसकर साहेबांच्या नेतृत्वा खाली गावचा विकास करणार आहोत.

मिनाज पठाण.
ग्रामस्थ, सोनी जवळा.
२)सोनी जवळा ग्रामपंचायत च्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच आमचे जेष्ठ नेते आदरणीय रमेशराव आडसकर साहेब यांचे मला पक्ष प्रवेश दिल्या बद्दल खुप खुप आभारी आहे.गोविंद ससाणे. सरपंच, ग्रामपंचायत सोनी जवळा.
यावेळी मा ,भागवत पवार, अविनाश ससाणे, वैजिनाथ गायकवाड, भागवत कोकाटे, महादेव वसेकर, अनिल ससाणे, कल्याण पवार ग्रामपंचायत सदस्य इत्यादी उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com

मुख्यमंत्री साहेब एकीकडे रेल्वे बीड करांना मिळाल्याचा संतोष एकीकडे असंतोष हे योग्य आहे का

बीड शहरातील गोरे वस्तीतील पिकांचे नुकसान घरात पाणी गेलेल्या लोकांना पडला प्रश्न– अशोक ढोले पाटील

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी नुकतेच बीडकरांचे स्वप्न पूर्ण केले आहे रेल्वेच्या माध्यमातून परंतु एकीकडे बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील नागरिकांमध्ये संतोष तर दुसरीकडे बीड शहरातील बार्शी नाका या बाजूच्या गोरे वस्तीवरील लोकांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे एकीकडे आनंद तर दुसरीकडे असंतोष अशा प्रकारची वेळ सध्या बीड करांवर आली आहे बीड जवळील बार्शी रोड गोरे वस्तीवरील परिसरामध्ये असलेल्या रेल्वे स्टेशनच्या पुलाचे जे पाणी आहे ते गोरे वस्तीतील लोकांच्या घरात शिरले आहेत या ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या मुक्या जनावरांच्या खाली पाणी गेले आहे तर या भागामधील राहणाऱ्या शेतकरी बांधवांच्या अन्नधान्याचे नुकसान देखील घरांमध्ये हे पाणी नसल्यामुळे खूप मोठे नुकसान झाले आहे गोरे वस्तीतील लोकांना सहन करावे लागत आहे म्हणून एकीकडे नाराजीचा सूर लोकांमध्ये आहे तर दुसरीकडे आनंदाचा वारा वाहू लागला आहे स्वप्न पूर्ण झाले जरी असले बिडकारांचे रेल्वेमुळे मात्र हे स्वप्न पूर्ण व्हायच्या अगोदर जो रेल्वेचा सर्वे असतो तो सर्वे चुकीचा झाला चुकीच्या पद्धतीने पुल बांधण्यात

आला आहे तसच तसंच नाली हि वस्तीवरील घरांमध्ये पाणी गेले नसते ही बांधली आसती तर या लोकांच्या गोरे मोठी चूक रेल्वेच्या कॉन्ट्रॅक्टदारांकडून झालेली आहे तरी मुख्यमंत्री साहेबांनी या गंभीर विषयाकडे लक्ष देऊन बीड शहरातील बार्शी रोड गोरे वस्तीवर अनंत गोरे, शिवाजी गोरे,बबन गोरे,मदन गोरे,भागवत गोरे, राघु गोरे,जगन गोरे ,अक्षय गोरे,मारुती गोरे , मनोज गोरे,लहु गोरे, अंकुश गोरे, अशोक काळे, अशोक चव्हाण, दत्ता जगताप,राहुल काळे, कैलास शिंगण,डिगांबर गोरे,सह राहणाऱ्या नागरिकांचे जे आर्थिक नुकसान झाले आहे ते नुकसान तात्काळ रेल्वे अधिकाऱ्यांच्या माध्यमातून भरपाई करून देण्याचे आदेश संबंधित कॉन्ट्रॅक्टदार रेल्वे प्रशासन यांना द्यावेत असे एक प्रसिद्ध पत्र बीड शहरातील नामांकित समाजसेवक अशोक ढोले पाटील यांनी या प्रसिद्धी माध्यमाच्या माध्यमातून माध्यमाला कळवले आहे जर हे त्या दोन-चार दिवसांमध्ये जर या महत्त्वाच्या विषयाची दखल रेल्वे प्रशासनाने जर नाही घेतली तर लोकशाही पद्धतीने रेल्वे स्टेशनच्या ठिकाणी या सर्व लोकांच्या समवेत एक मोठे आंदोलन छेडण्याचा इशारा देखील सामाजिक कार्यकर्ते अशोक ढोले पाटील यांनी दिला आहे .

जागतिक आरोग्य संस्थेच्या शिष्टमंडळाची बीड जिल्हा हिवताप कार्यालयाला भेट; कामगिरीचे कौतुक

बीड (प्रतिनिधी):जागतिक आरोग्य संस्था (थकज) यांच्या शिष्टमंडळाने आज बीड जिल्हा हिवताप कार्यालयाला विशेष भेट दिली. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी श्री. विजयसिंह शिंदे यांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांना शाबासकीची थाप देण्यात आली.सद्याच्या पावसाळी परिस्थितीतही बीड जिल्हात हिवतापाचा एकही रुग्ण आढळलेला नाही, तसेच डेंग्यू आणि चिकनगुनियासारख्या कीटकजन्य रोगांचे प्रमाण अत्यल्प असल्याचे निदर्शनास आले. या उल्लेखनीय काम गिरीची दखल घेत थकज शिष्टमंडळाने जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेला प्रत्यक्ष भेट देण्याचा निर्णय घेतला.या दौऱ्यात त्यांनी जिल्ह्यातील विविध आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालय बीड येथे पाहणी केली. तसेच, अंबाजोगाई येथील ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयालाही भेट देण्याचे नियोजन आहे.जिल्ह्यातील कीटकजन्य आजारांवरील नियंत्रणाबाबतचा आढावा घेत असताना थकज शिष्टमंडळाने जिल्हा हिवताप कार्यालयाच्या कामगिरीचे विशेष कौतुक केले.या सर्व यशस्वी कामकाजामागे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास

गंडाळ यांचे मार्गदर्शन लाभले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली ही व्यवस्था कार्यरत आहे.या भेटीदरम्यान श्री. विजयसिंह शिंदे यांनी थकज च्या अधिकाऱ्यांचे स्वागत व सत्कार केला. कार्यक्रमास जिल्हा हिवताप कार्यालयातील सर्व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.या भेटीद्वारे बीड जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेच्या कार्यक्षम तेवर एक सकारात्मक शिक्कामोर्तब झाले आहे.

महेबूबनगर मध्ये पिण्याचे पाण्याची पाईप लाईन करा व मूरूम टांका ;- नाजेर कुरेशी

माजलगांव नगर परिषद चा दूर्लक्ष,

प्रतिनिधि (.....)माजलगांव शहरात एक ते दिड किमी अंतरावर महेबूबनगर आहे, या महेबूबनगर मध्ये अतिवृष्टीमुळे खुप चिखल झाले आहे, सदर चिखला मुळे विद्यार्थी व वयोवृध्द व्यक्तींना चालता फिरता येत नाही विद्यार्थीयांचे शाळा बुढत आहे, विद्यार्थी यांची शांळा बुढत असल्यामुळे त्यांचे शैक्षणिक आतोनात नुकसान होत आहे. तसेच महेबूबनगर ला पिण्याचे पाण्याचे सोय नाही लोका ना वन वन भंटकती करून बोर पंप वाल्याना भिंक मांगुण पिण्याचे पाणी भरावे लागत आहे, सदर बोअरवेल चे पाणी पिऊन आरोग्यास धोका निर्माण होत आहे.तरी अधिक्षक मुढे साहेबांनी महेबूबनगर वासियानांच्या गल्लीत मुरूम टाकुण न नळाची पाईप लाईन करूण द्यावी नंसता आपल्या कार्यालय समोर लोकशाही मार्गाने महेबुब नगर येथील नागरिकांना सोबत घेऊण आंदोलन दि.०२/१०/२०२५ रोजी बेशरम चे झाडे देऊन आंदोलन करण्यात येईल असे कार्यालयिन अधिक्षक मुंडे साहेब यांना निवेदन पत्रकार नाजेर कुरेशी यांनी दिले आहे,

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तसेच जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांची काल विनोद मुळूक सदिच्छा भेट...!! या प्रसंगी उपस्थित भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, अशोक शेठ लोढा, जिल्हा बँकेचे अध्यक्ष आदित्यजी सारडा, नगरसेवक जगदीश भाऊ गुरुखुदे, सलीम भाई जहांगीर व मित्र परिवार...!!

शेतकऱ्यांनी तार कुंपण योजना चा लाभ घ्यावा – भाऊसाहेब भवर, अनिल कातवटे, किशोर नागरगोजे यांचे आवाहन

पाटोदा (प्रतिनिधी) शेतकऱ्यांच्या शेतीचे वन्यप्राण्यांपासून व चोरीपासून संरक्षण करण्यासाठी शासनाने राबविलेली शेतासाठी तार कुंपण योजना ही अत्यंत उपयुक्त योजना असून पाटोदा तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अंमळनेर जिल्हा परिषद गटाचेनेते भाऊसाहेब भवर,अनिल कातवटे व किशोर नागरगोजे यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना तब्बल ९० टक्के अनुदान मिळणार असून त्यामुळे

शेतांचे संरक्षण, उत्पादनवाढ व आर्थिक बोजा कमी होणार आहे. या योजनेचे फायदे पिकांचे वन्य प्राण्यांपासून संरक्षण,शेतातील नुकसान कमी होऊन उत्पादन वाढ,पिकांचे चोरी व इतर नुकसान टळणार यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे शेतकरी ओळख क्रमांक,आधार कार्ड इच्छुक शेतकऱ्यांनी आपल्या श्रेयश डिजिटल पंचायत समिती कॉम्प्लेक्स पाटोदा यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन अमळनेर जिल्हा परिषद गटाचेनेते भाऊसाहेब आण्णा भावर,अनिल कातवटे, किशोर नागरगोजे यांनी केले आहे.

वांगी येथे बांधावर जाऊन तहसीलदार शेळके यांची पाहणी , शेतकऱ्यांना दिलासा गावोगावी , बांधावर जाऊन पंचनामे होणार - कोणीही काळजी करु नये - शेळके

बीड प्रतिनिधी : गेल्या पाच - सात दिवसांपासून सतत कोसळणाऱ्या पावसामुळे बीड जिल्ह्यात शेती , पूल व रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे . या पार्श्वभूमीवर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वांगी येथे शेतात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला तसेच पूरामुळे बाधित झालेल्या पुलाची पाहणी केली . महसूल , कृषी विभागाचे अधिकारी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते .

लोकप्रतिनिधींसह प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी गावोगावी जाऊन नुकसानीचा आढावा घेत आहेत . शासनाने तात्काळ पंचनामे करून अहवाल दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत . छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर व बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तालुकास्तरीय समित्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जनतेला आवाहन केले की , " प्रशासन आपल्या सोबत ठामपणे उभे आहे . कोणत्याही शेतकऱ्याला किंवा नागरिकाला एकटे वाटू देणार नाही . नुकसानीच्या पाहणीसाठी प्रशासन सज्ज आहे ."

जिल्ह्या प्रशासनाच्या सूचनेनुसार तहसीलदार , गटविकास अधिकारी , तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अधिनस्त अधिकारी तातडीने पाहणी व पंचनामे करीत आहेत .

अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनीही जनतेला आवाहन केले असून आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील , असे सांगितले . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे वेळोवेळी नैसर्गिक आपत्तीचा



आढावा घेऊन तात्काळ सूचना देत आहेत . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे व कोणतीही अडचण तातडीने कळवावी , असे आवाहन केले आहे .

नैसर्गिक आपत्तीग्रस्त पंचनाम्यासाठी ग्रामस्तरावर त्रिस्तरीय समिती कार्यरत असते . या समितीत ग्राम महसूल अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांचा समावेश असतो . समितीचा अहवाल तहसीलदारामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जातो . जिल्हाधिकारी शासनाकडे निधीची मागणी करून तो निधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्याची प्रक्रिया राबवितात .

जिल्ह्यातील पावसाची सद्यस्थिती पाहता , बीड जिल्ह्याचा सरासरी पाऊस जून ते सप्टेंबर कालावधीत ५६६.१ मिमी इतका असतो , मात्र यंदा १८ सप्टेंबरपर्यंत एकूण ६४१.६ मिमी पाऊस झाला असून तो सरासरीच्या ११३.३ टक्के आहे . मागील वर्षी याच काळात हा पाऊस ६९२.५ मिमी म्हणजेच १२२.३ टक्के झाला होता . तालुकानिहाय पाहता धारूर तालुक्यात सर्वाधिक ७८१.६ मिमी (१९६.७ टक्के) , तर आष्टी तालुक्यात सर्वात कमी ४०३.६ मिमी (७३.९ टक्के) पाऊस झाला आहे . आंबाजोगाईत ७१६.४ मिमी (११३.३ टक्के) , मजलगावात ६१९.३ मिमी (११३.४ टक्के) , गेवराईत ६६१.२ मिमी (११२.६ टक्के) , शिरूर कासार येथे ६५६.५ मिमी (१२७.३ टक्के) , केज येथे ६२८.९ मिमी (१०७.८ टक्के) , पाटोदा येथे ६१५.६ मिमी (११४.३ टक्के) , वडवणी येथे ५३६.० मिमी (८९.२ टक्के) आणि परळी वैजापूर येथे ५५९.१ मिमी (८९ टक्के) पाऊस झाला आहे . बीड तालुक्यातील सर्कलनिहाय आकडेवारीनुसार १८ सप्टेंबरपर्यंत एकूण १९९.२ मिमी पाऊस झाला असून तो सरासरीच्या १०९.६ टक्के आहे . यंदा आतापर्यंत ७ पावसाळी दिवसांची नोंद झाली आहे .

वांगी येथील पाहणी करतेवेळी सरपंच कमल वाघमारे ,मंडळ अधिकारी शीतल चाटे , ग्रामसेवसूल अधिकारी राधिका बहिर , ग्रामपंचायत अधिकारी श्री लोमटे , सहायक कृषी अधिकारी श्री रोहिटे यांच्यासह अच्युत शेळके , तुकाराम शेळके , गोरख शेळके , आत्माराम हाडूळे, सुरेश हाडूळे , अंगद हाडूळे ,श्रीहरी शेळके , प्रशांत शेळके , महादेव शेळके उपसरपंच दिनकर शेळके , दीपक शेळके , कल्याण शेळके , वैजनाथ कुलगुडे , मच्छिंद्र यादव , काशिनाथ यादव , रोहित राऊत,अशोक शेळके , प्रकाश हाडुळे , महेश शेळके , प्रभाकर कुलगुडे , शिवाजी कोलगुडे , दत्तू यादव , अशोक गोडसे , बाळासाहेब गोडसे , बाबासाहेब शेळके हे उपस्थित होते .

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com